

**प्रेरणास्थान**
श्री. सुरेशदादा जैन

SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री श्रीमती प्रेमाबाई भिकमचंदजी जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

***आमचे ध्येय:***
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*

## “आमची शिष्यवृत्ती... करील तुमची ध्येयपूर्ती”



वर्ष ५ | अंक १५ | सप्टेंबर–डिसेंबर २०१६



# “स्वप्ने पहा, जोखीम घ्या आणि यशस्वी व्हा !!!”



प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आज आपण तीव्र स्पर्धेच्या युगात आहोत. म्हणूनच यशस्वी होण्यासाठी कधी नव्हे इतकी प्रयत्नांची पराकाष्ठा आपण केली पाहिजे. स्पर्धा कितीही तीव्र असली तरी घाबरण्याचे कारण नाही. कारण ग्लास पाण्याने पूर्ण भरला असला तरी हवा त्यावर आपले स्थान ठेवते. प्रचंड परिश्रम करण्याची तयारी, हार्डवर्कपेक्षा स्मार्ट वर्क, जिद्द, चिकाटी, गुणवत्तेची कास अन् नावीन्याचा ध्यास, योजनाबद्धता, क्रियाशीलता, नियोजनबद्धता व योग्य व्यवस्थापनातून जीवाचे रान करून नक्कीच आपण आपल्या आयुष्याचे उद्यान फुलवू शकतो. शाळा, महाविद्यालयातून आपण लघुकोन, काटकोन, विशालकोन इ. शिक्षण घेतो; परंतु एसडी–सीडद्वारे आयोजित शिबिरांमधून आपण शिकता जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन. जीवनाकडे वेगळेपणाने बघण्याची वेगळी दृष्टी, ठरवेल आमची नवीन सृष्टी.

एका वाटसरूला तीन व्यक्ती कन्स्ट्रक्शन साईटवर काम करतांना दिसतात. तो पहिल्यास विचारतो, 'तू काय करतोस?' ती व्यक्ती सांगते, ''दिसत नाही, मी बांधकाम करतो.'' दुसऱ्यास विचारतो, ''तू काय करत आहेस?'' ती व्यक्ती म्हणते, ''दिसत नाही तुला, मी रोजी रोटी कमावत आहे.'' जेव्हा वाटसरू तिसऱ्या व्यक्तीस विचारतो, ''आपण काय करत आहात येथे?'' ती व्यक्ती म्हणते ''मी जगातील सर्वोत्तम स्मारक निर्माण करीत आहे.'' काम एकच, परंतु प्रत्येकाचा त्या कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन भिन्न. आपण जे करू ते सर्वोत्कृष्ट असा ध्यास घेतल्यास निर्मितीसुद्धा तशीच होते. मित्रांनो, आमचे इंग्रजीचे शिक्षक नेहमी विचारायचे, ''ऑर्डीनरी आणि एक्स्ट्राऑर्डीनरी यांत काय फरक आहे?'' उत्तरही तेच द्यायचे, फरक आहे फक्त 'एक्स्ट्रा' म्हणजेच जे करणार त्यात थोडे 'एक्स्ट्रा' केले, मूल्यवर्धन केले म्हणजे आपण 'एक्स्ट्राऑर्डिनरी' होतो.

यशस्वी होण्यासाठी समर्पण (Dedication), ठामनिर्णय (Determination), भक्ती (Devotion), शिस्त (Discipline) आणि विशिष्ट कालमर्यादा (Deadline) या पाच D's महत्त्वाच्या आहेत. आपण Reactive होण्याऐवजी स्वयंप्रेरित (Proactive) व्हावे. यशाची 'पीईएफ' त्रिसूत्रीत पी–म्हणजे 'पॅशन', ई–म्हणजे 'एक्सलन्स', म्हणजेच उत्कृष्टता, प्राविण्य मिळवणे आणि एफ–म्हणजे 'फोकस्ड' राहणे महत्त्वाचे आहे. यशस्वी व्हायचे असल्यास 'पीईएफ' त्रिसूत्री कायम लक्षात ठेवणे गरजेचे आहे. १७ ते २३ या सहा वर्षाच्या काळात व्यक्तिमत्व फुलत असते. ते विकसित करण्यासाठी, प्रगल्भ करण्यासाठी, नोकरीच्या बाजारात यशस्वी होण्यासाठी शॉर्टकट नाहीत. 'सॉफ्टस्किल्स' हे 'लाईफस्किल्स' आहेत ते विकसित करावेत.

स्वप्ने पाहिल्याशिवाय प्रगती होणार नाही, म्हणून स्वप्ने पाहणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. स्वप्ने पाहणे सोडून देवू नका. त्यावरच तुमचे पुढील आराखडे ठरविता येतात. परंतु, त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे जोखीम (रिस्क) घेणे होय. ती घेतल्यामुळेच आपण किंवा इतर कोणीही कल्पना न केलेली उंची गाठू शकतो. आपणाजवळ आपली स्वप्ने सत्यात उतरविण्याचे धैर्य असावे लागते. एखाद्याला आपली शक्ती आणि कार्यशक्तीची जाणीव असणे म्हणजे 'विश्वास' होय. विश्वासानेच जीवनात यशाला वश करावयास शिकले पाहिजे. आपणा सगळ्यांकडे शक्ती आणि कार्यशक्ती असते त्यामुळे आपल्यातील उत्तमाची जाण करून घ्यावयास हवी. आपल्याला काय आवडते हे जसे महत्त्वाचे असते त्याचप्रमाणे आपण समाजासाठी काय विधायक करू शकतो याचीही जाण घ्यावयाला पाहिजे.

आपल्या जीवनात आपण गाठावयाचे ध्येय स्पष्ट ठेवा आणि ते गाठण्याचा प्रयत्न करा. स्वयंशिस्त बाळगा. तुम्ही जे करीत आहांत, त्याचा आनंद उपभोगा आणि तुम्ही जेव्हा तुमच्या आवडीच्या विषयात रस घेता त्याचवेळेस तुम्ही तुमची प्रगती विनासायास करू शकता.

विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक ध्येय साध्य करण्यासाठी, त्यांच्यातील सॉफ्टस्किल्सचा विकास करण्यासाठी, त्यांच्या स्वप्नांच्या पंखांना बळ देवून उंच आकाशात मुक्तविहार करण्याचे धाडस त्यांच्यात निर्माण करण्याचे अत्यंत तळमळीने आणि समर्पनात्मक भावनेने एसडी–सीडचे हे कार्य विद्यार्थ्यांना तिमीरातून क्षितीजापलीकडे तेजापर्यंत नक्कीच घेवून जाण्यास मदत करीत आहेत. भविष्यातही एसडी–सीड ह्या गुणवंत लेकरांना अनेक प्रकारे मदतीसाठी तत्पर आहे.

खरंच, एसडी–सीडच्या विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या फक्त शैक्षणिक विकासावर भर न देता सर्वांगीण विकास साधण्यासाठी केला जाणारा प्रयत्न प्रशंसनीय आहे. विद्यार्थीहिताचे हे कार्य करत असतांना काही आव्हानेसुद्धा समोर आहेत. त्यात महत्त्वाचे म्हणजे 'ड्रॉप आऊट' विद्यार्थ्यांचे प्रमाण होय.

शिष्यवृत्ती वाटप करतांना लक्षात आले की, विद्यार्थी मध्येच आपले शिक्षण थांबवतात. कारणे अनेक आहेत, परंतू आजच्या काळाचा विचार करता आव्हानांवर मात करून शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे.

एसडी–सीड या आव्हानाला सामोरे जावू इच्छिते व विद्यार्थ्यांना आवाहन करू इच्छिते की, आपण आपल्या व्यथा आमच्यासमोर मांडाव्यात, निसंकोचपणे आपण आमच्या कार्यास प्रतिसाद द्यावा. एसडी–सीड सदैव मदतीसाठी आपल्या पाठीशी उभी आहे. आपण सर्व मिळून प्रयत्न करूया की कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

**— एन. जे. गादिया**
**गव्हर्निंग बोर्ड सदस्य, एसडी–सीड, जळगाव**

**या अंकात...** **पृष्ठ क्र.**


| या अंकात... | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. एसडी–सीड शिष्यवृत्ती वितरण सोहळा | ३ |
| ३. एसडी–सीड शिष्यवृत्ती वितरण सोहळा | ४ |
| ४. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ५ |
| ५. परीक्षेचे नियोजन | ६ |
| ६. श्रवण कौशल्य – एक उपयुक्त अभ्यासकौशल्य | ७ |
| ७. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |


## ज्ञानयज्ञ संपादक मंडळ

श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

# 'एसडी–सीडच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना सेवाभाव, दातृत्व यांसारखे संस्कार मिळत आहे''

## एसडी–सीड शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात मान्यवरांचे गौरवोद्गार

एसडी–सीडतर्फे २०१६ सालातील शिष्यवृत्ती वितरण सोहळा नुकताच जळगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यात जिल्हयातील ५०० गुणवंतांना 'मातोश्री प्रेमाबाई भिकमचंदजी जैन उच्चशिक्षण' शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. २००८ सालापासून १२००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. त्यातील सुमारे २७०० विद्यार्थ्यांनी त्यांचे उच्चशिक्षण पूर्ण करून आज ते नोकरी किंवा व्यवसाय क्षेत्रात आहेत तसेच काहींनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये इंजिनिअरिंग, टेक्नोलॉजी, मेडिकल, कॉम्प्युटर, मॅनेजमेंट, आर्टस्, कॉमर्स इत्यादी शाखांचा समावेश आहे. यांपैकी विशेष म्हणजे इंजिनिअरिंग शाखेतील ६२ टक्के विद्यार्थी आहेत. शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात निवड झालेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी काही निवडक लाभार्थ्यांना खालील मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना मागदर्शनपर केलेल्या भाषणातील काही मुद्दे खाली नमूद केले आहेत.

## मान्यवरांचे मनोगत

**मा. डॉ. राजन वेळूकर** – माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

एसडी–सीडची मदत मिळालेले विद्यार्थी आज दुस–याला देण्यासाठी सज्ज झालेले आहेत. या माध्यमातून समाजपरिवर्तन घडत आहे.विद्यार्थ्यांमधील देण्याची वृत्ती हीच एसडी–सीडचा हा शिक्षणरूपी रथ पुढे घेवून जातील. त्यांनी मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना खालील मुद्दे मांडले.

- सेवाभाव व दातृत्व हे शिक्षणाचे अंग आहेत. जे आपल्याकडे उपलब्ध आहे ते इतरांकडे नाही व त्यांना मदतीची गरज आहे, अशा स्थितीत आपण इतरांना मदत केली पाहिजे. हा शिक्षणाचा महत्त्वाचा संस्कार आहे.
- ही मदत एक संधी म्हणून पाहावी आणि त्याद्वारे विकास साधावा. मुख्य म्हणजे शिक्षण आणि विकास यांचा परस्पर संबंध आहे. कारण जितके जास्त शिक्षण तेवढा देशाचा विकास जास्त होत आहे.




**प्रो. पी. पी. पाटील** – कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

एका माणसाने शंभर पावले उचलण्यापेक्षा शंभर माणसांनी एकच पाउल उचलले म्हणजे ते समाजाच्या भल्यासाठी असते. हाच विचार मा. सुरेशदादांनी घेवून जाती–पातीपलीकडे गुणवंत विद्यार्थ्यांना एक मदतीचा हात दिला आहे. आर्थिक विवंचनेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी या योजनेच्या माध्यमातून हे महत्त्वपूर्ण काम केले जात आहे. विद्यार्थ्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी ही योजना संजीवनी ठरली आहे.




**प्रा. प्रकाश पाठक** – कार्यकारी संचालक, भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक

व्यक्तीच्या मनामध्ये जेव्हा कर्तव्याची भावना अधिक जागृत होते, ती वर जाते तेव्हा त्याच्यातून निर्माण होणारी कृती ही कर्मयोगाला साजेशी असते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना खालील मुद्दे मांडले

- शिष्यवृत्ती हा निधी आहे मात्र तो देण्यामागे ज्यांचा भाव असतो तो ओळखणे महत्त्वाचे आहे.
- आपण जी मदत घेतो तिची कृतज्ञता तर बाळगलीच पाहिजे. शिवाय आपले कर्तव्य समजून इतरांना मदत करण्याची भावना आपल्या मनात निर्माण झाली तरच हा कार्यक्रम सफल होईल.



## एक दृष्टीक्षेप...

### दीप प्रज्वलन, मान्यवरांचे स्वागत व त्यांना मानपत्र प्रदान करताना











### उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व पालक वर्ग





### मान्यवरांकडून लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप









**मागील चार महिन्यात एसडी–सीडने विद्यार्थीहितासाठी खाली दिलेल्या विविध विषयांवर एकूण ८ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्यात सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.**

### 'ध्येय निश्चिती व संपादन'

**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे
**ठिकाण:** एच. जे. थिम कला व विज्ञान महाविद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे २३० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

### 'विविध कौशल्य विकास'

**मार्गदर्शक:** सौ. पुष्पा भंडारी – एसडी–सीड, सल्लागार समिती सदस्य
**ठिकाण:** नंदिनीबाई वामनराव मुलींचे ज्युनिअर कॉलेज, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १८० विद्यार्थीनींनी याचा लाभ घेतला.

### 'वेळेचे नियोजन'

**मार्गदर्शक:** सुरेश पांडे
**ठिकाण:** नंदिनीबाई वामनराव मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १३५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

### 'करिअर मार्गदर्शन'

**मार्गदर्शक:** प्रविण सोनवणे एसडी–सीड असोसिएट
**ठिकाण:** अभिनव माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १२० विद्यार्थीनींनी याचा लाभ घेतला.

### 'इंग्रजी संभाषण कौशल्य'

**मार्गदर्शक:** श्री. अभिजीत कुलकर्णी
**ठिकाण:** जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १३० विद्यार्थीनीं याचा लाभ घेतला.

### 'भाषण कौशल्य विकास'

**मार्गदर्शक:** श्री. महेश गोरडे
**ठिकाण:** नूतन मराठा कॉलेज, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १८० विद्यार्थीनीं याचा लाभ घेतला.

### 'मनाची एकाग्रता'

**मार्गदर्शक:** श्री. प्रविण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट
**ठिकाण:** चांदसरकर माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे १४० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला

### 'मनाची एकाग्रता'

**मार्गदर्शक:** श्री. प्रविण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट
**ठिकाण:** मातोश्री प्रेमाबाई जैन माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** सुमारे ९० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला








### 'वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन'

विद्यार्थ्यांमधील विविध सुप्त कौशल्यांचा परिपूर्ण विकास घडावा, नुसते पुस्तकी ज्ञान असून चालणार नाही तर या स्पर्धात्मक युगात स्वत:ला जर सिद्ध करायचे असेल तर त्यांचा सर्वकष विकास होणे महत्त्वाचे आहे. हा दृष्टीकोन समोर ठेवून एसडी–सीडतर्फे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



**ठिकाण:** जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, मेहरूण, जळगांव
**सहभाग:** एकूण ४ शाळांमधील २५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.
**स्पर्धेचे विषय:** १. पर्यावरण संवर्धन, २. टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट – फायदे आणि तोटे, ३. मैदानी खेळांचे महत्त्व
**परीक्षक:**

१. प्रा. एस.व्ही. सोमवंशी – सदस्य, एसडी–सीड सल्लागार समिती
२. डॉ. डी.यु. राठोड – प्राध्यापक, नंदिनीबाई वामनराव उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
३. सौ. ज्योती पाटील – मुख्याध्यापिका, जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, मेहरूण, जळगांव

**प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकांना एसडी–सीडतर्फे प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देवून गौरविण्यात आले. तसेच एका अपंग विद्यार्थ्याला उत्तेजनार्थ बक्षिस आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले.**

# परीक्षेचे नियोजन

परीक्षेच्या नावाने सर्वांनाच टेन्शन येते. असे वाटते कोणी काढली ही परीक्षा? तर परीक्षा फक्त मार्कांसाठी घेत नाही तर...

★ परीक्षा एक संधी असते,
★ स्वत:ला तपासून पाहण्याची...
★ स्वत:ला जाणून घेण्याची...
★ प्रयत्न पुरेसे होते की कमी पडले याचे उत्तर शोधण्याची...
★ अभ्यासाची दिशा योग्य होती की अयोग्य ते समजण्याची...
★ स्वत:मधील क्षमतांचा विकास करण्याची...
★ एक सराव भविष्यातील आव्हाने पेलण्याचा...
★ मागील टप्प्यांवरून एक तरी पाउल पुढे आलो की जागेवरच आहोत, हे लक्षात येण्याची...
★ काय केलं तर अपयश येतं व काय केलं म्हणजे यश मिळतं याची गुरूकिल्ली मिळण्याची... आपण केलेल्या मुल्यमापनाची...

## परीक्षेच्या दोन महिने आधी काय करावे?

- शाळा / कॉलेज, क्लासेस व तुमचा अभ्यास यांचे व्यवस्थित नियोजन करा.
- लेखन सरावासाठी तीस टक्के वेळ द्या.
- नकारात्मक विचार करू नका व ऐकू नका.
- जे समजत नाही ते विचारण्याचा संकोच करू नका.
- प्रत्येक विषयाचा करावयाचा अभ्यास आपल्यासमोर लेखी स्वरूपात असावा, त्यामुळे भर कशावर द्यावा हे कळते.

## परीक्षेला निघतांना...

- आवश्यक सर्व साहित्य सोबत घ्या.
- हलका आहार घ्या.
- रस्त्यातील वाहतूक, ट्रॅफिक जॅमचा विचार करून योग्य वेळेत निघा.
- उन्हात जात असाल तर टोपी घाला किंवा रूमालाने डोके बांधा.
- परीक्षेच्या अर्धा तास आधी परीक्षाकेंद्रावर पोहचा.

## परीक्षेच्या हॉलमध्ये...

- बेंच न हलणारा व चांगल्या अवस्थेत आहे याची खात्री करून घ्या. अन्यथा पर्यवेक्षकांना आधीच त्याची कल्पना द्या.
- शिक्षक वर्गात येण्याआधी, तसेच प्रश्नपत्रिका हातात पडेपर्यंत संपूर्ण काळ मानसिकदृष्ट्या महत्वाचा असतो. म्हणून मानसिक संतुलन बनवून ठेवा.
- परीक्षेच्या भीतीच्या जास्त आहारी जावू नका आणि अतिउत्साहसुध्दा करू नका.
- आपले मन स्थिर ठेवा. सकारात्मक विचार ठेवा.

## उत्तरपत्रिका सोडवितांना....

- सुवाच्य अक्षरात आपला नंबर, केंद्र, दिनांक अशी सर्व महत्वाची माहिती भरावी.
- निळ्या किंवा काळ्या शाईच्याच पेनाचा वापर करावा. दोन अतिरिक्त पेन जवळ असू द्यावे.
- एकदा संपूर्ण प्रश्नपत्रिका काळजीपूर्वक वाचा. सोपे प्रश्न लक्षात घ्या. प्रश्नांची निवड महत्वाची असते.
- उत्तराचा आराखडा मनात तयार करा. विचारले तेच व विचारले तेवढेच लिहा.
- योग्य तेवढाच समास सोडून लिखानकाम करा.
- एका पानावर एकाच प्रश्नाचे उत्तर लिहावे. नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.
- प्रश्नांचा क्रमांक अथवा उपप्रश्न क्रमांक ठळक अक्षरात लिहावा.
- गुणांनुसार व अपेक्षेनुसार संक्षिप्त अथवा विस्तृत उत्तर लिहावे.
- लेखन व्याकरणदृष्टया शुद्ध हवे.
- मोठ्या उत्तरामध्ये प्रस्तावना, मुख्य मुद्दे व समारोप योग्य शब्दांत केलेला असावा.
- प्रस्तावना प्रभावी व मुद्देसूद असावी.
- संपूर्ण उत्तराचा सारांश देवून व आपले मत योग्य शब्दांत मांडून शेवट करावा.
- उत्तरांत आवश्यक तेथे उदाहरणे, काव्यपंक्ती, आकृत्या, चित्रे, आलेख वाक्प्रचार यांचा उपयोग करावा.
- आधी सोप्या प्रश्नांची निवड करावी.
- उत्तरपत्रिकेत प्रश्न लिहू नयेत. परंतू त्यांचे क्रमांक व्यवस्थित टाकावेत.
- इंग्रजीतील स्पेलिंगकडे लक्ष द्यावे. गणितातील आकडे लिहितांना इंग्रजी आकडेच काटेकोरपणे व काळजीपूर्वक लिहावेत.
- उत्तरपत्रिकेवर कोठेही डाग पाडू नये. चित्रे काढू नयेत किंवा परीक्षकांसाठी सूचना लिहू नये.
- उत्तरपत्रिकेतील पहिल्या पानावरचे व शेवटच्या पानावरचे अक्षर सारखेच सुवाच्य असायला हवे.
- उत्तर पूर्ण झाल्यावर खालच्या ओळीवर ठळक रेषा मारावी.

परीक्षकाचे लक्ष वेधून घेणारी व विद्यार्थ्याला काय सांगायचे आहे ते नेमकेपणाने, स्पष्टपणे, मोजक्या शब्दांत, आकर्षक स्वरूपात सांगणारी उत्तरपत्रिका असायला हवी. अशी उत्तरपत्रिका परीक्षकावर सकारात्मक प्रभाव पाडते व तुम्हाला उत्तम गुण देवून जाते.

## पेपर झाल्यावर...

- पेपरनंतर उत्तरांबाबत मित्रांसोबत चर्चा टाळा.
- किती गुण मिळतील यांची बेरीज करत बसू नका.
- काही उत्तरे चुकली असल्यास त्यांचा विचार न करता जे बरोबर लिहिले आहे, त्यावर समाधानी राहण्याचा प्रयत्न करावा.
- पुढच्या पेपरची जोमाने तयारी सुरू करावी.

# श्रवण कौशल्य – एक उपयुक्त अभ्यासकौशल्य...

विद्यार्थी मित्रांनो, परीक्षेतील तुमचे यश हे केवळ तुमच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून नसते; तर तुमच्या अभ्यासाच्या पद्धतीवर किंवा तंत्रावर अवलंबून असते. अभ्यास तर सर्वचजण करतात; पण जे विद्यार्थी अभ्यासकौशल्यांचा उपयोग करतात त्यांना अभ्यासाचे दडपण वाटत नाही. केलेल्या अभ्यासाचे व्यवस्थित आकलन होते. अभ्यासाच्या कोणत्याही समस्या आड येत नाही.

श्रवण, वाचन, स्मरण, लेखन, निरीक्षण आणि गटचर्चा या सहा अभ्यासकौशल्यांच्या मदतीने विद्यार्थी हमखास यशस्वी होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने ही अभ्यासकौशल्ये आत्मसात करायला हवीत. त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, पण एकदा का तुम्ही ही कौशल्ये आत्मसात केली, की तुमच्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण होईल व यशाच्या आकाशात तुम्ही उत्तुंग भरारी घ्याल.

## श्रवण कौशल्य :

आपल्या संपूर्ण शैक्षणिक व व्यावहारिक आयुष्यात लेखन, वाचनापेक्षा ऐकण्याचे कार्य आपण सर्वाधिक करत असतो. ऐकणं म्हणजे आपल्याला 'ऐकलेलं सर्व समजलं' असा त्याचा अर्थ होत नाही. कितीतरी प्रकारचे आवाज आपण दिवसभरात ऐकतो; पण आपण ते जाणीवपूर्वक समजून घेतो व लक्षात ठेवतोच असे नाही. श्रवण म्हणजे ऐकलेले आवाज व शब्द यांचा संपूर्ण अर्थ समजणे आणि अशा रीतीने समजून घेवून आपण जे ऐकतो त्याला 'श्रवण' म्हणतात.

### श्रवणकौशल्य विकसित करण्यासाठी.....

१. ऐकण्याची इच्छा हवी
२. मन एकाग्र ठेवा
३. उद्देश ओळखा
४. महत्त्वाचा तपशील ओळखा
५. देहबोली
६. रेकॉर्डिंगचा प्रभावी वापर

श्रवणकौशल्य विकसित करायचे असेल तर नियमित ऐका. ऐकतांना संक्षिप्त टिपण काढण्याची सवय ठेवा. यामुळे ऐकतांना समजलेले महत्वाचे मुद्दे व न समजलेली माहिती लिखित स्वरूपात आपल्याजवळ राहते. न समजलेले मुद्दे नंतर शिक्षकांकडून समजून घेता येतात.

जी माहिती आपण ऐकतो ती इतरांना सांगा. त्यामुळे ऐकलेल्या माहितीची योग्य स्वरूपात मांडणी केली जाते व इतरांना सांगितली म्हणजे आपले श्रवण कसे झाले, कुठे कमी पडलो हेसुद्धा आपल्या लक्षात येते व सुधारणा करता येतात.

**एकाग्रतेने श्रवण करा**
↓
**टिपण काढा**
↓
**श्रवण केलेली माहिती इतरांना सांगा / लिहून काढा**

## श्रवणकौशल्य विकसित करतांना हे टाळा

**१. बोलणा–याबद्दल पूर्वग्रह :**
वक्ता, शिक्षक अथवा बोलणारी व्यक्ती कुणीही असो, तिच्याबद्दल मनात कुठलाही 'किंतु–परंतु' नको. एखाद्या शिक्षकाबद्दल मनात प्रतिकूल समज असेल तर त्यांच्या शिकविण्याकडे आपण व्यवस्थित लक्ष देवूच शकणार नाही.

**२. मन भरकटणे :**
ऐकता ऐकता अनेकदा इतर विचार मनात येतात. आणि एकदा मन भरकटले, की ते लगेच एकाग्र होत नाही.

**३. मनामधील नकारात्मक प्रतिक्रिया :**
वक्त्याबद्दल मनात नकारात्मक भाव निर्माण होतो आणि त्यामुळे ऐकण्याकडे दुर्लक्ष होते.

**४. मध्येच अडथळा आणणे :**
आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करण्यासाठी काहीजण मध्ये मध्ये वक्त्याला सूचनाही करत असतात. या सर्वांमुळे श्रवणात अडथळा निर्माण होतो.

**५. भावनांवर नियंत्रण नसणे :**
ऐकतांना राग, द्वेष, हळवेपणा, मत्सर अशा भावना दूर ठेवा. मन शांत नसेल तर श्रवण व्यवस्थित होणार नाही.

## कौशल्यपूर्वक श्रवणाचे फायदे :

- कौशल्यपूर्वक श्रवणाने ऐकलेली माहिती आपण योग्य अर्थासह समजून घेवू शकतो. आकलनशक्ती वाढते.
- लेखनकौशल्यही सुधारते.
- ऐकता ऐकता महत्वाची टिपणे काढता येतात.
- आपली कल्पनाशक्ती अधिक विकसित होते.
- ऐकलेल्या माहितीचा सर्वांगाने विचार करण्याची व समजावून घेण्याची सवय लागते.

## आमची उद्दिष्टे

ज्ञानयज्ञ

* सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
* सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
* सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



**तेजश्री रविंद्र भार्गव, यावल — BE Computers (4th Year)**

मी जळगाव शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बीई कॉम्प्युटर्सच्या शेवटच्या वर्षात शिकत असून इयत्ता ११वी पासून मला एसडी–सीड शिष्यवृत्ती प्रदान होत आहे. यामुळे आर्थिक प्रमाणात मला बरीच मदत होत आहे. शिष्यवृत्तीसोबतच या योजनेच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या दुकानांमधून मला शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास देखील मोठी सवलत मिळाली ज्याचा मला खुपच फायदा झाला.



**सचिन भागवत पाटील, मुक्ताईनगर — BE Mechanical (4th Year)**

मला येथे नमूद करण्यास अतिशय आनंद होतो की, मागील चार वर्षांपासून मला एसडी–सीड योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्राप्त होत आहे. माझ्या घरची परिस्थिती फार हलाखीची आहे आणि अशा नाजूक स्थितीमध्ये मला प्रत्येक वर्षी जी शिष्यवृत्ती मिळते त्याचा मला शैक्षणिक बाबतीत खुपच मोठा आधार मिळत आहे, ज्यामुळे माझे शिक्षण अखंडपणे चालू आहे.

मा. दादांनी सुरू केलेले हे कार्य खुप महान आहे, ज्याची इतर कोणत्याही कार्याशी तुलना होवू शकत नाही. त्यांनी माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना दिलेली साथ अशीच राहो, अशी मी त्यांना विनंती करतो. त्यांना उदंड आयुष्य लाभो, हिच ईश्वरचरणी प्रार्थना.



**आरती संजय साखळकर, भुसावळ — BCom (1st Year)**

मी नववीत असताना माझ्यावरील वडीलांचे छत्र हरवल्यामुळे माझे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आई खुप कष्ट करीत आहे. पण त्याचबरोबर एसडी–सीडच्या मिळणा–या शिष्यवृत्तीमुळे मी शिक्षण घेताना ज्या आर्थिक अडचणी आल्या त्यावर यशस्वीपणे मात करू शकले. ही शिष्यवृत्ती म्हणजे मा. सुरेशदादा यांचा अतिशय कौतुकास्पद उपक्रम आहे. माझ्या मनातील जिद्दीला व चिकाटीला या शिष्यवृत्तीची जोड मिळाली आहे, ज्यामुळे माझे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण होत आहे.

मी देखील प्रामाणिकपणे शिक्षणाकडे ज्यांची ओढ आहे त्यांना मदत करीन. मा. सुरेशदादांचे मी मन:पूर्वक आभार मानते कारण त्यांच्या या मदतीमुळेच माझे स्वप्न मला साकार करण्यासाठी मोलाची साथ लाभली आहे.



**अनिकेत यशवंत आवारे, जळगाव — BE Mechanical (4th Year)**

माझ्या शैक्षणिक प्रवासात ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्यात एसडी–सीडची शिष्यवृत्ती फार महत्त्वाची आहे, त्यामुळे मी त्यांचा आजन्म ऋणी राहील. वयाच्या ७व्या वर्षीच वडीलांचे छत्र हरवल्यानंतर आईने सांभाळ करून १०वी पर्यंतचे शिक्षण दिले, परंतु पुढच्या शिक्षणाची चिंता असतानाच ही शिष्यवृत्ती माझ्यासाठी अगदी देवासारखी धावून आली. कारण यामुळेच मी पुढील शिक्षणाची फी भरू शकलो आणि पुस्तके खरेदी करण्यासही याची मदत झाली.

मी मा. दादांचे आणि त्यांच्या सर्व सहका–यांचे खुप खुप आभार व्यक्त करतो. त्यांनी जळगावमध्ये अशी अभिनव संकल्पना सुरू करून आर्थिक मागासवर्गीय मुलांना मदतीचा हात देवू केला. मला नोकरी लागल्यावर मी देखील या योजनेस शक्य होईल तितकी मदत करीन, असे वचन देतो.


SD SEED

Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**

7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.

Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in